INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2019 Special Issue – 171 (C)

## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

अतिथी संपादक -
डॉ.व्ही. एस. सावंत
प्राचार्य
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव

कार्यकारी संपादक -
डॉ. बी. एस. चव्हाण
डॉ. जी. एस. भोसले
डॉ. बी. एस. लोकडे

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर (येवला)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (C)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March -2019

अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | भटक्या – विमुक्त समाजातील विवाहपद्धत | डॉ.रमेश पोळ | 07 |
| 2 | भटक्या - विमुक्तांच्या जात – पंचायती स्वरूप व महत्त्व | डॉ.रेश्मा दिवेकर | 11 |
| 3 | भटक्यांचे आत्मकथन आणि जीवन जाणीवा | डॉ.एल.एन.वाघमारे | 15 |
| 4 | रामनाथ चव्हाणांचे समाजशास्त्रीय लेखन – 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग' | प्रा.विजयकुमार घोडके व डॉ.राजेंद्र ठाकरे | 20 |
| 5 | भटक्या जाती – जमातींच्या समस्या आणि उपाय | डॉ. विठोबा मस्के | 25 |
| 6 | बेलदार – पारधी जमातीचे प्रभावी चित्रण | डॉ.शशिकला रणदिवे | 30 |
| 7 | भटक्या विमुक्तांचे स्त्री आत्मकथन | डॉ. शहाजी पाटील | 34 |
| 8 | भटक्या – विमुक्तांच्या आत्मकथनातील समाज व त्यांच्या समस्या | डॉ.बाळासाहेब शेळके | 38 |
| 9 | 'फेसाटी' कादंबरीतील धनगर समाजाचे श्रम वं सांस्कृती | डॉ.संग्राम थोरात | 42 |
| 10 | भटक्या – विमुक्त जमातीच्या सामाजिक समस्या व उपाय | डॉ.संजय शिंदे | 49 |
| 11 | भटक्या विमुक्तांच्या लोककलांचे प्रकार व स्वरूप | डॉ. सयाजीराव गायकवाड | 54 |
| 12 | 'नाथपंथी डवरी गोसावी : समाज आणि संस्कृती' | प्रा. तुकाराम जाधव | 62 |
| 13 | भटक्या विमुक्तांच्या जातपंचायत व महा जातपंचायतीचे स्वरूप व महत्त्व | दगडूबा माघाडे | 67 |
| 14 | 'उचल्या'या भटक्या समाजातील स्त्रीजीवन | डॉ. धनंजय होनमाने | 72 |
| 15 | किशोर शांताबाई काळे यांच्या 'कोल्हाट्याचं पोर' मधील स्त्री चित्रण | धनश्री पाटील | 75 |
| 16 | आत्मकथनातून व्यक्त झालेले भटक्या स्त्री जीवनाचे चित्रण | प्रा.एन.सी.सर्वगोड | 79 |
| 17 | "वासुदेव" या भटक्या जमातीची श्रमसंस्कृती व कला – आविष्कार | प्रवीण भोसले | 84 |
| 18 | भटक्या विमुक्तांच्या समस्या व शासकीय उपाययोजना | प्रा.बी.बी.घुरके व प्रा.पी.एस.चौगुले | 91 |
| 19 | भटक्या विमुक्तांचे साहित्य आणि आजचे वास्तव | प्रा. युवराज खरात | 95 |
| 20 | मागती जमात – "डक्कलवार" | वनिता होवाळे | 97 |
| 21 | भटक्या विमुक्तांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था, सातारा | प्रा.विनायक राऊत | 102 |
| 22 | भटक्या – विमुक्तांची आत्मकथने | प्रा.मोहन चव्हाण | 107 |
| 23 | 'माणदेशी माणसं' मधील भटक्या विमुक्त जाती जमातींचे जीवन | प्रा.श्रीकांत बोधे | 112 |
| 24 | 'एक भटकी जमात : धनगर' | डॉ. संगीता पैकेकरी | 115 |
| 25 | भटक्या विमुक्त साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप | डॉ.सरला गोरे-सावकारे | 119 |
| 26 | भटक्या – विमुक्तांच्या आत्मकथानातील बोली भाषा | प्रा.साधू कोळेकर | 122 |
| 27 | बेलदार ह्या भटक्या समाजातील लोकसंस्कृती | भाग्यशाली कांबळे | 126 |
| 28 | भटक्या – विमुक्तांच्या जाती-जमातीतील लग्नविधी व रीतिरिवाज | सौ.मच्छगंधाली तारळेकर | 133 |
| 29 | 'उपरा'मधील स्त्रियांची व्यथा – वेदना | डॉ.मानसी जगदाळे | 138 |

# 'नाथपंथी डवरी गोसावी : समाज आणि संस्कृती'

प्रा. तुकाराम भिवसेन जाधव
मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर,
मो.९९७५९५९६१०
E-mail:tukaramjadhav2010@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेत आपल्याला अनेक धर्म, पंथ आणि जाती–उपजाती पाहायला मिळतात. या प्रत्येक धर्मपंथातील व्यक्तीची जात ही वेगवेगळी आहे. या प्रत्येक व्यक्तीच्या जातीची परत पोटजात वेगवेगळी आहे. त्यामुळे प्रत्येक जातीतील व्यक्ती हा आपल्या स्वत:च्या जातीला इतरांच्या जातीपेक्षा वेगळी आणि श्रेष्ठ मानतो. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या वर्ण जातीव्यवस्थेला बिनशिडीच्या इमारतीच्या मनोऱ्याची उपमा दिली आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत पूर्वी 'गावगाडा' हा अलुतेदार व बलुतेदार यांच्या साहाय्याने चालायचा. या गावगाड्यातील सर्वच व्यवहार हे आप–आपसात होत असत. परंतु या गावगाड्याच्या परिघाबाहेर जगणाऱ्या काही भटक्या जमातीही आहेत. त्या भटक्या जमातीतील एक महत्त्वपूर्ण जमात म्हणजेच गोसावी. या जमातीला भारतीय अर्थव्यवस्थेत 'संन्यस्त वृत्ती'चे प्रतीक मानले जाते.

**नाथपंथी डवरी गोसावी समाज :**

पूर्वीच्या काळी अखंड बालब्रह्मचारी अवस्थेत जंगलात एकांकात योग अभ्यास करणे, तसेच तपश्चर्या करीत आयुष्य घालविणाऱ्या ऋषीमुनींची मोठी परंपरा आपल्याला पाहायला मिळते. याच परंपरेला पुढे चालू ठेवण्याचे कार्य 'गोसावी' समाजाने केले आहे. या जमातीचे लोक जटा वाढवून, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा घालून, भगवी वस्त्रे नसून देवाच्या नावाने दारोदार भिक्षा मागताना आजही आपल्याला दिसतात. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''गेल्या अनेक वर्षापासून अशा प्रकारे संन्याशांच्या वेशात दारोदार भिक्षा मागून स्वत:ची उपजीविका करणारा विशिष्ट जमातीचा समूह भटकत आहे, त्यांना भटके 'गोसावी' य नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र शासनाने 'गोसावी' ही भटकी जमात म्हणूनच नोंद केलेली आहे. यांना 'गाव गोसावी' असेही म्हणतात.''[१] म्हणजेच हा समाज आपल्या दैनंदिन उपजीविकेसाठी सातत्याने भटकत असतो. तसेच या जमातीच्या लोकांमध्ये संन्यस्तवृत्ती आपल्याला पाहायला मिळते. आज या जमातीचे काही लोक बाळी, बुगडी, नथी, मणी, पोत, माळा, घरोघरी फिरुन विकतात. तसेच नाक–कान टोचण्याचा व्यवसायही करतात. यातील काही लोक तर म्हशींचा व्यापारही करतात. त्याचबरोबर या जमातीतील 'लवंगी गोसावी' ही जमात तर पूर्वीपासून व्यापार करणारी असल्याचे आढळते.

**गोसावी जमातीचे प्रकार :**

'गोसावी' या भटक्या जमातीतही अनेक उपप्रकार आहेत. त्यात गोसावी, गिरी गोसावी, गाव गोसावी, डवरी गोसावी, दसनाम गोसावी आणि गाफा गोसावी हे प्रमुख उपप्रकार या जमातीचे आहेत. या प्रत्येक जमातीचा प्रत्येकाचा व्यवसाय, परंपरा, भाषा, देवदेवता, खाणं पिणं, जगणं–मरणं या सर्व बाबी वेगवेगळ्या

आहेत. या जमातीतील काही लोक म्हशींचा व्यापार करुन सधन झाले आहेत. ते स्थिर झाले आहेत तर आजही काही जमाती या उदरनिर्वाहासाठी भटकंती करताना दिसतात. त्यातीलच 'नाथपंथी डवरी गोसावी' ही एक जमात आहे.

**नाथपंथी डवरी गोसावी :**

महाराष्ट्रातील 'गोसावी' या भटक्या जमातीतील एक पोटजमात म्हणजे नाथपंथी डवरी गोसावी. या जमातीच्या विषयी रामनाथ चव्हाण यांनी 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत' या ग्रंथात सविस्तर विवेचन केले आहे. ते म्हणतात, ''महाराष्ट्रात गोसावी समाजाच्या अनेक जाती पोटजाती आहेत. उदा. बैरागी, सारंग, सरस्वती, भारती, बाबा संन्यासी आणि गिरी गोसावी या प्रमुख असून नाथपंथी डवरी गोसावी ही त्यापैकीच एक पोटजात आहे. याशिवाय 'भराडी' या स्वतंत्र जातीची नोंद महाराष्ट्र शासनाच्या भटक्या जातींच्या पोटजाती म्हणून किंव तत्सम जाती म्हणून किंगरीवाले, नाथबाबा, नाथजोशी, लवंगी, बाळसंतोषी आणि 'डवरी' या नावाच्या पोटजातींचा समावेश केलेला आहे.''[२] या विश्लेषणाधारे गोसावी समाजाच्या अनेक जाती–पोटजातींचा आपल्याला परिचय तर होतोच त्याचबरोबर 'गोसावी' समाजाच्या पोटजातींच्या प्रकारातील नाथपंथी डवरी गोसावी या जमातीची ओळखही होते.

**नाथपंथी डवरी गोसावी जमातीची वैशिष्ट्ये :**

नाथपंथी डवरी गोसावी या जमातीची काही ठळक वैशिष्ट्ये आपल्याला त्यांच्या एकूणच व्यवसाय, पोशाख, राहणीमान, भाषा, त्यांचे आपापसातील एकूणच व्यवहार यावरुन सांगता येतात. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''संन्यस्त वेषातील गोसावी मंडळी प्रत्येक जण स्वतंत्र असल्याचे सांगतो. आपली जात, आपला पंथ, आपला समाज वेगळा असल्याचे सांगतो. हे लोक आपापसात कसलेही व्यवहार करीत नाहीत. त्यांच्यापैकी काही मंडळी बालब्रह्मचारी असल्याचे सांगतात तर काही प्रपंचातून परमार्थाकडे वाटचाल करतोय असे भासवतात. भिक्षेपुरती भगवी वस्त्रं घालायची, एरवी काळा शर्ट, धोतर किंवा पँट अशा ग्रामीण अथवा आधुनिक पोशाखात वावरायचं हे त्यांच्यापैकी काही भिक्षेकऱ्यांचं वैशिष्ट्य आहे. नाथपंथी डवरी गोसावी हा असाच एक प्रपंच करीत संन्यासी वेषात भिक्षा मागून पोट भरणारा समाज आहे.''[३] म्हणजेच गोसावी जमातीतील उपजाती ह्या आपल्या स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय करतात. या लोकांच्या राहणीमानाचे वैशिष्ट्य म्हणजे भिक्षेच्या वेळेला ही लोकं भगवी वस्त्रं वापरतात व इतर वेळेला काळ्या रंगाचे शर्ट व पँट किंवा इतर रंगाचे वस्त्रं वापरतात. या जमातीचे लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी संन्याशाच्या वेषात भिक्षा मागताना आजही दिसतात. त्यामुळेच रामनाथ चव्हाण यांचे मत यथार्थ आहे.

**नाथपंथी डवरी गोसावी समाजाची संस्कृती :**

नाथपंथी डवरी गोसावी समाजाची संस्कृती पाहण्या अगोदर 'संस्कृती' म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर पाहणे आवश्यक आहे. या प्रश्नांचे उत्तर शोधताना आपल्याला 'संस्कृती'च्या विविध मान्यवरांनी केलेल्या व्याख्यांचा संदर्भ घेणे महत्त्वाचे आहे. या संस्कृती विषयीच्या व्याख्या विविध अभ्यासकांनी विविध विश्लेषणाधारे केल्या आहेत. त्यात १) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्याचे स्वतःवर व बाह्यविश्वावर संस्कार करुन आविष्कार करतो, ती पद्धती व तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय.''[४]

२. सुप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे म्हणतात, ''मनुष्यनिर्मित पदार्थमय आणि कल्पनामय जग म्हणजे संस्कृती.''[५]

३. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तत्त्वचिंतक डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, ''सम्यक कृती म्हणजे संस्कृती.''[६]

अशा काही संस्कृतीच्या व्याख्या विविध विचारवतांनी केल्या आहेत. य सर्व व्याख्यांमधून मानवाच्या एकूण चालीरीति, रुढी, परंपरा, त्यांचे आचरण यालाच 'संस्कृती' असा शब्दप्रयोग केलेला आहे. या संस्कृतीमध्ये त्यांची भाषा, विवाह पद्धती, व्यवसाय, पोशाख, सण–उत्सव, कुलदेवता, अंधश्रद्धा, जातपंचायत, अंत्यविधी, संकेत, स्त्रीयांचा दर्जा, विधवा पुनर्विवाह, इ. घटकांचा समावेश होतो. त्यापैकी काही घटकांचा येथे विचार केला आहे. त्यात –

**१. भाषा :**

नाथपंथी डवरी गोसावी समाज हा महाराष्ट्रातील असून त्याची मातृभाषा मराठी आहे. या समाजाची जन्मभूमी सातारा–सांगली या भागात आहे. या जमातीचे लोक आपल्या जमातीत बोलताना त्यांच्या बोली भाषेत बोलतात परंतु जेव्हा इतर व्यक्तींच्या समोर बोलतात त्यावेळी मात्र वेगळी भाषा वापरली जाते. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''प्रत्येक जमातीची बोलीभाषा वेगळी आहे. त्याचप्रमाणे इतर व्यक्तीला किंवा जातीबाहेरच्यांना आपले व्यवहार अथवा बोलणे कळू नये म्हणून पिढ्यानूपिढ्या एक वेगळी सांकेतिक भाषा बोलली जाते., त्या भाषेला 'गुप्तभाषा' किंवा 'पारुषी भाषा' असे म्हणतात. या भाषेत भारतीय भाषांतील अनेक शब्दांचे मिश्रण आढळते. य भाषेला लिपी नाही, केवळ गुप्त संभाषणाकरिताच या सांकेतिक भाषेचा वापर केला जातो.''[७] यावरुनच आपल्याला नाथपंथी डवरी गोसावी जमातीच्या भाषेचा, बोलीचा, त्यांच्या सांकेतिक बोलीचा परिचय होतो.

**२. अनिष्ट प्रथा :**

नाथपंथी गोसावी या जमातीत अनिष्ठ प्रथा आजही पाहायला मिळतात. या प्रथांविषयी रामनाथ चव्हाणा म्हणतात, ''या समाजात परंपरेने चालत आलेली आणखी एक विचित्र प्रथा आहे. एखाद्या व्यक्तीने त्याच्या सख्या भावाची बायको भावाच्या मृत्युनंतर पत्नी म्हणून स्वीकारली किंवा तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि लग्न केले तर अशा व्यक्तीचे कल्ले आणि डावी मिशी जातपंचायत काढून टाकते किंवा त्याला काढण्यास भाग पाडते. याशिवाय त्याला दोनशे नव्वदं दंड केला जातो आणि बाईकडून साठ रुपये दंड म्हणून वसूल केला जातो. यशिवाय जातपंचायतीला तीन पागोटी, तीन चंदनाचे पाट, साडेतीनशे रुपयांचे बकरे दंड म्हणून द्यावे लागते,. बकरे कापून संपूर्ण समाजाला जेवण दिले जाते.''[८] म्हणजेच या जमातीत आजही अशा अनिष्ट, प्रथा आपल्याला पाहायला मिळतात.

**३. जातपंचायत :**

नाथपंथी डवरी गोसावी या जमातीच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची 'जातपंचायत'. या समाजात आपापसातील वाद, न्यायनिवाडे हे जातपंचायतीतच सोडवले जातात. जातपंचायतीचा निर्णयच या समाजात अंतिम मानला जातो. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''इतर भटक्या समाजाप्रमाणे या समाजातही जातपंचायतींचे अस्तित्व अजून टिकून आहे. पंचायतीच्या प्रमुखास पाटील असे म्हणतात. समाजातील लग्न व्यवहार पार पाडणे, भांडणतंटा मिटविणे किंवा समाजबाह्य, जातपंचायतीच्या पारंपरिक अलिखित नियमांना डावलून एखादे कृत्य करणाऱ्यांना समाज बहिष्कृत करणे किंवा काही रक्कम दंड करणे अशी कामे पंचायतीला करावी लागतात.''[९] नाथपंथी डवरी गोसावी समाजात आजही जातपंचायतीचे अस्तित्व महत्त्वपूर्ण आहे. या

समाजातील सर्वच व्यवहारावर जातपंचायतीचे कडक लक्ष असते. जातपंचायतीच्या नियमाना डावलून असे एखादे कृत्य केले तर त्या समाजातील व्यक्तीला आजही वाळीत टाकणे, दंड यासारख्या शिक्षाना सामोरे जावे लागते. एकूणच, या समाजात जातपंचायतीचे स्थान निर्विवाद श्रेष्ठ स्वरुपाचे आहे.

**४. पुनर्विवाह अमान्य :**

नाथपंथी डवरी गोसावी समाजात आजही एखाद्या स्त्रीचा पती मरण पावला. किंवा त्या स्त्रीला तिच्या लग्नाच्या नवऱ्यासोबत नांदण्याची इच्छा नसेल तर तिला पुनर्विवाह करता येत नाही. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''या समाजात स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची मुभा नाही. एखाद्या स्त्रीने विवाह केला आणि तिची तिच्या नवऱ्याजवळ नांदण्याची इच्छा नसेल तर अशा स्त्रीला लग्नाच्या पतीला सोडून दुसरा विवाह करता येत नाही आणि तसा प्रयत्न एखाद्या विवाहित महिलेने केलाच तर तिला समाजातून बहिष्कृत केले जाते. त्याला 'गोते' असे म्हणतात.''[१०] म्हणजेच या समाजात स्त्रीची इच्छा असो अथवा नसो त्या स्त्रीला पुनर्विवाह कोणत्याही कारणास्तव करता येत नाही. जर त्या स्त्रीने तसे करण्याचा प्रयत्न केला तर जातपंचायत त्या स्त्रीला समाजातून बहिष्कृत करते व त्यालाच 'गोते' असे म्हणतात.

**५. हुंडा पद्धती :**

हुंडा पद्धती भारतीय समाजजीवनात आजही सुरु आहे. हुंडा हा लग्नात मुलीकडून मुलाला दिला जातो. याचे स्वरुप रोख रक्कम, भांडीकुंडी, दाग–दागिने, इतर वस्तू अशा प्रकारचे असते. डवरी गोसावी या समाजात मात्र लग्नवेळी मुलाला हुंडा देण्याची प्रथा या समाजात नाही. उलट मुलीला काही रक्कम लग्न खर्चासाठी द्यावी लागते. त्याला 'दयाज' असे म्हणतात.

**६. मैताची प्रथा :**

नाथपंथी डवरी गोसावी या समाजातील लोकांची अंत्यविधीची (मैतीची प्रथा) ही वेगळी आहे. हे लोक हिंदूधर्मीय असले तरी प्रेताचे दहन न करता सर्रास दफन केले जाते. या प्रथेविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''प्रेताला चादरीत किंवा गोधडीत झोळी करुन ती बांबूला अडकवून स्मशानात किंवा दफनाचे जागी नेतात. ज्या घरात मैत होते त्या घरात सुत्तक म्हणून कसलेही धुणे धुतले जात नाही. सुतक तीन दिवसांचे मानून त्या काळात डाळरोटीचा नैवेद्य प्रेताला पुरले त्या ठिकाणी दाखवला जातो. मृत्युनंतर शुद्ध होण्यासाठी सहा महिन्यांच्या आत बोकडं कापून समाजाला जेवण द्यावे लागते. मात्र मृताच्या घरी सहा महिने सुतक म्हणून मांस खाल्ले जात नाही. सुतकात किंवा मृत्यू नंतर त्याच्या नातेवाईकांचे केस, दाढी कापणे अशुभ मानले जाते. मृत माणसाचं स्मरण म्हणून त्याच्या नावाने चांदीचे मुखवटे करुन देव्हाऱ्यात ठेवण्याची प्रथा आहे. त्याला ते 'टाक' असे म्हणतात. या समाजात प्रत्येकाच्या घरी असे देव्हारे आणि टाक पाहावयास मिळतात.''[११] म्हणजेच या समाजात एखाद्या व्यक्तीच्या मृत्यू नंतर त्याला स्मशानात नेण्याची पद्धत ही इतर समाजापेक्षा वेगळी आहे. इतकेच नाही तर त्या व्यक्तीच्या मृत्यू नंतर त्या समाजात सुतक पाळले जाते व त्याच्यातून शुद्धीकरणासाठी सहा महिन्याच्या आत बोकडा कापून समाजाला जेवण द्यावे लागते. इतर समाजाचा विचार करता ही प्रथा अनोखी वाटते कारण इतर समाजात व्यक्तीच्या मृत्यू नंतर गोड जेवण दिले जाते. त्यामुळेच इतर समाजाच्या तुलनेत या समाजाची अंत्यविधीची प्रथाही वेगळी आहे.

**समारोप :**

'नाथपंथी डवरी गोसावी' समाज हा भारतीय समाजव्यवस्थेत परंपरागत अनेक विचित्र रुढी, परंपरा उराशी बाळगून भिक्षेवर जगणारा समाज आहे. या समाजात अनेक रुढी, प्रथा, परंपरा, आजही अस्तित्वात

आहेत. या समाजात आजही आपापसातील वाद भांडण, तंटे हे न्यायालयातर्फे न सोडवता ते त्यांच्या जातपंचायतीद्वारेच सोडविले जातात. आज आपण २१ व्या विज्ञान तंत्रज्ञानयुगात वावरत असतानाही हा समाज मात्र आपल्या जुन्या, अनिष्ठ रुढी, परंपरांना चिकटून बसलेला आजही दिसतो. त्यामुळेच समाजाची भौतिक प्रगती झालेली दिसत नाही., या समाजाच्या संस्कृतीच्या दृष्टीने भाषा, अनिष्ट प्रथा, जातपंचायत, पुनर्विवाह, हुंडा पद्धती, मैत्रीची प्रथा या बाबींचाच प्रामुख्याने येथे विचार केला आहे. या सर्व घटकांचा संस्कृतीची वैशिष्ट्ये, वेगळेपण म्हणून विचार केला तरी मात्र या समाजाने काळाची पावले ओळखून काळाच्या प्रवाहासोबत चालताना काही प्रथा सोडून नव्या संस्कृतीचा, शिक्षणाचा, विज्ञान तंत्रज्ञानाचा अंगिकार करणे आवश्यक आहे, त्यामुळेच तो समाज समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहात येईल हे मात्र नक्की!

संदर्भ :

१. रामनाथ चव्हाण – 'भटक्या–विमुक्ताचे अंतरंग', सुगावा प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, जानेवारी २०१३, पृ. ३५.३६.
२. रामनाथ चव्हाण – भटक्या विमुक्तांची जातपंचायत–देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. पुणे प्रथमावृत्ती ५ मार्च २००२, पृ. ०१.
३. रामनाथ चव्हाण – 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', आशय प्रकाशन, पुणे – चौथी आवृत्ती, २०१४, पृ. १४.
४. दत्ता भगत–'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती – २००८, पृ. १३.
५. तत्रैव, पृ. २४.
६. तत्रैव, पृ. ३१.
७. रामनाथ चव्हाण – 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत', देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि. पुणे, प्रथमावृत्ती – ५ मार्च २००२, पृ. ३.४
८. रामनाथ चव्हाण – 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', आशय प्रकाशन, पुणे – चौथी आवृत्ती, २०१४, पृ. ४९
९. तत्रैव, पृ. ४३
१०. तत्रैव, पृ. ४९
११. तत्रैव, पृ. ५०